पुढारी

# ‘रगेडियन मॅरेथॉन’ खेळ विकासासाठी पोषक

## विविध शाळा, महाविद्यालयांच्या संचालक, प्राचार्यांच्या प्रतिक्रिया

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

कोल्हापूर रन अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेमुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये विविध खेळांबद्दल आवड निर्माण होऊन खेळ विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होत असल्याच्या प्रतिक्रिया विविध शाळा, महाविद्यालयांच्या संचालक, प्राचार्य व कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तींनी व्यक्त केल्या.

रगेडियन क्लबतर्फे ‘रगेडियन कोल्हापूर रन अल्ट्रा मॅरेथॉन’चे १० फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची सुरुवात मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम चौकातून होणार आहे. मॅरेथॉनसाठी १८ वर्षांच्या आतील, १८ ते ३५, ३५ ते ५०, ५० ते ६५ आणि ६५ वर्षांवरील मुले-मुली, महिला-पुरुष असे गट असणार आहेत. ५ कि.मी., १० कि.मी., २१ कि.मी., ४२ कि.मी आणि ५० कि.मी. अंतराची स्पर्धा असणार आहे. अपंगांसाठी स्वतंत्र गट असणार आहेत.



“ बॉडी बिल्डर्स आणि वेटलिफ्टर्समध्ये सप्लिमेंटस् म्हणजेच बीसीएए व ग्लुटामाईनचा वापर जास्त असतो. प्रत्येक खेळाडू व खास करून मॅरेथॉनसाठी आवश्यक असलेल्या या उत्पादनांवर लोकांमध्ये जागरूकता वाढविणे गरजेचे आहे. कोणतीही व्यक्ती खास करून मॅरेथॉनवर यांच्या सक्रिय जीवनशैलीमुळे त्यांच्या स्नायूंची लवचिकता कमी होते. ती भरून काढण्यासाठी दररोज आवश्यक असणारी पोषक तत्त्वे, जसे प्रोटिन व व्हिटॅमिन, अपरिपक्व भारतीय आहारामध्ये मिळत नाही. वैज्ञानिक संशोधनानुसार आपल्या शरीराला दररोज वजनाच्या दुप्पट प्रोटिनची आवश्यकता असते.

**आदर्श सोमाणी** उद्योजक व सहसंस्थापक-एक्सर फिट न्यूट्रिशन

स्पर्धेचे असोसिएट पार्टनर दैनिक ‘पुढारी’, गोल्ड स्पॉन्सर डीवायपी ग्रुप, पॉवर्ड बाय जे. के. वेल्थ प्रा. लि., सपोर्टेड पार्टनर जे. के. ग्रुप, फ्युएल पार्टनर कोरगावकर पंप, फिजिओ पार्टनर हिलिंग टच फिजिओ क्लिनिक, रेडिओ पार्टनर टोमॅटो एफ.एम. ९४.३, ट्रेनिंग पार्टनर अरहता यांच्या सहकार्याने स्पर्धा होत आहे. यात सहभागी होणाऱ्यांनी नावनोंदणीसाठी रगेडियन स्टोअर्स डीवायपी मॉल तिसरा मजला किंवा रगेडियन ऑफिस अमात्य टॉवर, चौथा मजला, दाभोळकर कॉर्नर येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ९६२३६८८८८३/८६ या क्रमांकांवर किंवा www.ruggedian.com येथे संपर्क साधावा.

पुढारी RUGGEDIAN